# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**प्राथमिक आरोग्य केंद्र (जि.रत्नागिरी) येथील डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना वेतन मिळत नसल्याबाबत**

**(१) १३९३ (२२-१२-२०१४) श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक आरोग्य केंद्र (जि. रत्नागिरी) येथे नेमण्यात आलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना गेल्या सहा महिन्यापासून वेतन देण्यात आले नसल्याची बाब नुकतीच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऑपरेटर्सची नेमणूक ही मुंबई येथील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम) या कार्यालयाकडून झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियुक्त करण्यात आलेल्या ऑपरेटर्सना मानधन न देण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९) :** (१) होय.

(२) नाही, हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेमण्यात आलेल्या डाटा एंन्ट्री ऑपरेटर्सच्या नेमणूका कंत्राटी पध्दतीने बाह्यस्थ संस्थेमार्फत करण्यात आल्या होत्या.

(३) सदरहू कंपनीने फेब्रुवारी, २०१४ ते ऑगस्ट, २०१४ या कालावधीमध्ये विहीत संख्येपेक्षा कमी उमेदवार उपलब्ध करुन दिल्यामूळे सदर कंपनीवर दंड आकारण्यात आला होता. त्यामूळे सदरहू कंपनीस संबंधित डाटा एन्ट्री ऑपरेटर्स यांचे वेतन अदा करणे शक्य झाले नाही, असे कंपनीने कळविले आहे.

(४) सदरहू कंपनीसोबत करण्यात आलेला करार रद्द करण्यात आला आहे.

---

**नाशिक जिल्हयात रुग्णांचा मृतदेह नेण्यासाठी रग्णवाहिका उपलब्ध करुन दिली जात नसल्याबाबत**

**(२) ४५५२८ (११-०५-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील रुग्णवाहिकेची सेवा उपलब्ध होण्याकरिता १०८ क्रमांकावर संपर्क साधावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील १०८ क्रमांकावर फक्त रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिला जात असून रुग्णांचे मृतदेह नेण्यासाठी रग्णवाहिका उपलब्ध करुन दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील शासनाच्या रुग्णालयातील रुग्णांचे मृतदेह नेण्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासकीय रुग्णालयातील रुग्णांचे मृतदेह ग्रामीण भागात घेऊन जाण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) याबाबत अद्यापही कोणत्याच उपाय योजना केल्या नसल्यास याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत रुग्णांना तातडीची वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी व रुग्णाच्या पुढील उपचारासाठी १०८ ही रुग्णवाहिका अत्यावश्यक आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, शासकीय रुग्णालयातील रुग्णाचा मृतदेह नेण्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे कोणतेही धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील भाटघर, वीर व नीरा-देवघरी या धरणातील पाणीसाठा अत्यल्प असल्याबाबत**

**(३) ४९८४६ (०३-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील भाटघर, वीर व नीरा-देवघरी या धरणातील पाणीसाठा मागील वर्षाच्या तुलनेत अत्यंत कमी असून अनुक्रमे ५.४, १.१० व ५.५० टी.एम.सी. एवढा पाणीसाठा उपलब्ध असून आजही तिन्ही धरणाचा विसर्ग सुरुच असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, भाटघर, वीरा व निरा-देवघर धरणातील पाण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक १७ ऑगस्ट, २०१५, दिनांक २२ ऑगस्ट, २०१५, दिनांक ०९ सप्टेंबर, २०१५ व दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालवा सल्लागार समितीच्या झालेल्या सभेतील निर्णयानुसार त्याची अंमलबजावणी न करता पाटबंधारे विभागाच्या मनमानी कारभारामुळे धरणाचा पाणीसाठा मागील वर्षीच्या तुलनेत अत्यल्प शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी पर्यंत पिण्याच्या पाण्याचे व उपसा जलसिंचन योजनेसाठी पाण्याचे काय नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०१-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही. कालवा सल्लागार समितीच्या दिनांक ३१.१.२०१५ रोजीच्या बैठकीत ठरलेल्या नियोजनानुसार पाण्याचा वापर करण्यात आलेला आहे.
(४) नीरा प्रणालीवर अवलंबून असणा-या पिण्याच्या पाण्याच्य योजनांसाठी दि. १५.०७.२०१६ पर्यंत पाणीसाठा उपलब्ध आहे. याबाबतचे नियोजन कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आलेले आहे. तसेच उपसा सिंचनासाठी आवश्यक पाणीसाठा जलाशयात उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर जिल्हयात हिमोफिलियाचे निदान झालेल्या रुग्णांची संख्येत झालेली वाढ

**(४) ५९७६० (३०-०८-२०१६) श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयात हिमोफिलियाचे निदान झालेल्या रुग्णांची संख्या जवळपास १००० हजार असल्याची बाब दिनांक १७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी यातील ४ ते ५ रुग्णांचा मृत्यू होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूरात मोठ्या प्रमाणात रुग्णांची संख्या असतांनाही या आजारावर निशुल्क औषध मिळत नसून “ॲन्टी हिमोफिलिक फॅक्टर” नागपूरात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, रुग्णांना उपचाराकरीता अमरावती येथे जावे लागत असल्याने नागपुरात १ सेन्टर सुरु करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत उपचाराची व्यवस्था केल्याने अमरावती येथे संदर्भीत केले जात नाही.

(५) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत सन २०१६-१७ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये नागपूर, पुणे, अहमदनगर व औरंगाबाद या शहरात हिमोफिलिया सेंटर सुरु करण्यात येत आहेत.

---

**भंडारा व गोदिंया जिल्हयातील निरीक्षणगृह व बालगृहांना अनुदान प्राप्त होत नसल्याबाबत**

**(५) ६३२८३ (२४-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागातर्फे अनाथ व निराधार तसेच बालगुन्हेगार, विधीसंघर्ष लहान बालकांसाठी अनुदानित तत्वावर खाजगी संस्थांकडून निरीक्षणगृह व बालगृहाचे चालविण्यात येते, हे खरे आहे काय

(२) असल्यास, भंडारा व गोंदिया जिल्हयातील निरीक्षणगृह व बालगृहाला गेल्या ९ वर्षापासून अनुदान प्राप्त झाले नाही. हे खरे आहे काय

(३) असल्यास, आय.सी.पी.एस.शी संलग्नित संस्थाना एकात्मिक बाल संरक्षण संस्थेअंतर्गत अनुदान देण्यात येते परंतु दिनांक ८ ऑक्टोंबर २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रवेशित दाखल होवूनही आय.सी.पी.एस. ला संलग्नित करण्यात आले नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन, पोषण आहार, घरभाडे, वीज आदि वरील खर्च संस्था करीत आहे. हे खरे आहे काय

(४) असल्यास, निरीक्षणगृह व बालगृहाचे अनुदान देण्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) गोंदिया जिल्हयामध्ये निरीक्षणगृह कार्यरत नाहीत. या जिल्हयातील कोणत्याही बालगृहाचे अनुदान प्रलंबित नाही तर भंडारा जिल्हयातील निरीक्षणगृह चालविणारी संस्था माहे फेब्रुवारी, २०११ ते ऑक्टोबर, २०१४ या काळात बंद होती. तद् नंतर संस्था सुरु झाली. मात्र, संस्थेचे कामकाज निकषानुसार नसल्याने संस्थेस माहे जून, २०१६ मध्ये कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेली होती. यावर, संस्थेकडून उत्तर अप्राप्त आहे. सबब, संस्थेस अनुदान अदा करणे शक्य झालेले नाही.

---

**राज्यात आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी बालविकास केंद्र सुरु करण्याबाबत**

**(६) ६९२८२ (२७-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्यभर बालविकास केंद्रे सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, मात्र निधीअभावी अनेक जिल्हयात ही केंद्रेच

सुरु झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आगामी अर्थसंकल्पात केलेली तरतूद गतवर्षीच्या तुलनेत ६२ टक्क्यांनी कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन निधी उपलब्ध करुन देत सदर बालविकास केंद्रे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०१-२०१९) :** (१) केंद्र शासनाच्या निधीतुन राज्यात ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना आरोग्य विभागाकडून सुरु होती यासाठी केंद्राकडून मिळणारा निधी बंद झाल्याने सदर योजना राज्यात बंद करण्यात आली होती. तथापि, राज्यात आदिवासी क्षेत्रात अति तीव्र कुपोषित बालकांसाठी (SAM) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याचा शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२) व (३) बाल विकास केंद्रासाठी केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत कोणत्याही प्रकारची तरतूद देण्यात येत नाही. केंद्र शासनाकडून नियमित पोषण आहारासाठी तरतूद देण्यात येते. बाल विकास केंद्र ही संपूर्णपणे राज्य शासनाची योजना आहे.
राज्यातील आदिवासी क्षेत्रात ग्राम बाल विकास केंद्र योजना सुरु करण्याचा शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर योजना राबविण्यासाठी रु. १८.७९ कोटी एवढी रक्कम प्रदान करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना, जळगांव बीड जिल्हयातील शिशुगृहातून मुलांना दत्तक दिल्याबाबत

**(७) ७५५८४ (१९-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना, जळगांव जिल्हयातील तसेच परळी (जि. बीड) तालुक्यातील शिशुगृहातून बालकांना दत्तक देण्यासाठी दत्तकेच्छूक पालकांकडून ३ लाख रुपये याप्रमाणे ३६० मुलांना दत्तक दिल्याची टाटीया शिशुगृहाचे संचालक श्री. धोका यांनी कबुली दिल्याचे अलिकडेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) महाराष्ट्र मारवाडी फौंडेशन जालना संच शिशुगृह जालना या संस्थेमध्ये संस्थेचे संचालक श्री धोका यांनी एका दत्तक विधान प्रकरणात

दत्तकेच्छुक पालकांकडून रु २.०० लक्ष घेतल्याचे त्यांच्या दिनांक ६.१२.२०१६ च्या खुलाशामध्ये नमूद केले आहे. तसेच जळगाव जिल्हयात एका दत्तक विधान प्रकरणात संस्थेचे सचिव, श्री.धोका यांनी रु. ३.०० लक्ष मागितले, याबाबतच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झालेल्या असून सदर बाब व्हिडीओ क्लीपव्दारे निदर्शनास आलेली आहे.
(२) संबंधित प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून, चौकशीअंती संस्थेकडून अनियमितता व नियमांचे उल्लंघन केले जात असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(३) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५, केंद्रीय आदर्श बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम-२०१६ व कारा नियमन-२०१७ यांतील तरतुदीच्या अनुषंगाने सुनावणी प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत इम्प्लांट खरेदी प्रकरणाबाबत**

**(८) ७५६१५ (१९-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत हाडाच्या शस्त्रक्रियेसाठी इम्प्लांटची मागणी नोंदविण्याबाबत सन २०१५ मध्ये चौदाही मेडिकल रुग्णालयांना पाठविलेल्या प्रस्तावानुसार शर्मा सर्जिकल्स तर्फे करण्यात आलेली कोटयवधी रुपयांची इम्प्लांट खरेदी चौदाही मेडिकल रुग्णालयांमध्ये पडून असून त्याचा उपयोग होत नसल्याने या सर्व इम्प्लांट खरेदी प्रकरणाची तातडीने चौकशी करण्यात यावी अशी मागणी होत असल्याची बाब दिनांक १२ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, मागणीनुसार इम्प्लांटचा पुरवठा करण्यात न आल्याच्या अनेक तक्रारी रुग्णालयांच्या अस्थीरोग विभागाने डीएमईआर कडे केले असून तसेच पुरवठा करण्यात आलेले इम्प्लांट वापराविना रुग्णालयात पडून असल्याची बाब तक्रारीत नमूद करण्यात येऊनही संबंधीत ठेकेदाराविरुध्द कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, इम्प्लांट खरेदी मध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याने याबाबतची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. संचालनालयामार्फत पुरवठा करण्यात आलेल्या इंम्प्लांटच्या वापरासंबंधी काही त्रुटी संबंधी संचालनालयाकडून दि.२८/२/२०१७

रोजी अधिष्ठाता, बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये सुस्पष्टता नसल्याने फेरचौकशी करण्यासाठी दि.३०/१०/२०१७ च्या आदेशान्वये आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गाठित करण्यात आली आहे. या समितीने सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) व (३) अ.क्र.१ येथे नमुद केल्यानुसार चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हणेगाव (जि.नांदेड) विभागातील अनाथ बालकआश्रम बंद असल्याबाबत**

**(९) ७६२२५ (१८-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हणेगाव (जि.नांदेड) विभागातील अनाथ बालकआश्रमांच्या तपासणी दौऱ्यात जिल्हयाचे न्यायाधीय गेले असता तेथील काही बालकआश्रम बंद अवस्थेत असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास त्यांना आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनाथ बालकआश्रमांची उच्चस्तरीय चौकशी शासनामार्फत करण्यात आली असता त्यात काय आढळून आले,

(३) तसेच बंद अवस्थेत असलेल्या अनाथ बालकआश्रमातील व्यवस्थापनेवर व संबंधित अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) होय,

महिला व बाल विकास विभागांतर्गत मान्यता असलेल्या हाणेगांव जि.नांदेड विभागात तीन बालगृहे असून सदर बालगृहात बाल कल्याण समिती मार्फत बालकांचे दाखल आदेश बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीनुसार झालेले नसल्यामूळे सदर बालगृहे चालू शैक्षणिक प्रवेशितांचे प्रवेश न झाल्यामूळे बालगृह सुरु झालेले नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**जळगाव जिल्हयात आनंदराज तांटीया या विनाअनुदान तत्वावर चालविल्या जाणाऱ्या बाल शिशूगृहात अनियमितता असल्याबाबत**

**(१०) ७६६०५ (१८-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात आनंदराज तांटीया या विनाअनुदान तत्वावर चालविल्या जाणाऱ्या बाल शिशूगृहात अनियमितता असल्याचे निदर्शनास आले असल्याने आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांनी सदर शिशूगृह बंद का करण्यात येऊ नये अशा प्रकारची कारणे दाखवा नोटीस दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास संस्थेस जारी केली होती, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेने कारणे दाखवा नोटीसीस ताबडतोब दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी खुलासा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खुलाशावर आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांचेकडून आजपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) दि.०४.०७.२०१६ च्या नोटिशीच्या अनुषंगाने संस्थेच्या खुलाशातील त्रुटीस अनुसरून आयुक्तालयाने अंतिम कारणे दाखवा नोटिस संस्थेस बजावली होती. तथापि, त्यानंतर प्राप्त झालेला खुलासाही संयुक्तिक व योग्य नसल्याने संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव आयुक्तालयाकडून शासनास प्राप्त झाला आहे.

सदर प्रस्तावास अनुसरून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५, केंद्रीय आदर्श बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम-२०१६ व कारा नियमन-२०१७ यांतील तरतुदीच्या अनुषंगाने सुनावणी प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परळी (जि. बीड) तालुक्यातील बंद असलेले बाल शिशुगृह पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(११) ७६६०६ (१८-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि. बीड) तालुक्यातील शासनाचे अनुदान न घेता दानशूर व्यक्तीच्या खाजगी सहभागातून चालविण्यात येत असलेले दिपचंद नेमीचंद बडेरा हे बाल शिशुगृह शासनाने दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास बालकाचे अपहरण झाल्याचा आरोप ठेवून बंद केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालकाच्या झालेल्या अपहरणाबाबत केलेली चौकशी व पोलीस तपासानुसार शासनाने शिशुगृह दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटी व शर्तीवर पुन्हा सुरु करण्याचे आदेश निर्गमित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार संस्थेने अटी व शर्तीची पुर्तता करुनही सदर बाल शिशुगृह अद्याप पूर्ववत सुरु न होता बंदच आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बाल शिशुगृह तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) नाही.

महाराष्ट्र मारवाडी फौंडेशन संचलित स्व. नेमीचंद बडेरा शिशुगृह, परळी जि. बीड या संस्थेच्या माहे जानेवारी, २०१५ मध्ये केलेल्या तपासणीत गंभीर त्रुटी आढळल्याने संस्थेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) संबंधित संस्थेच्या बीड, जालना व जळगाव येथील शिशुगृहातील बालकांच्या अनुषंगाने अपहरण, विक्री इ. सारख्या गंभीर तक्रारी शासनास प्राप्त झाल्याने सदर संस्थेबाबत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५, कैंद्रीय आदर्श बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम-२०१६ व कारा नियमन-२०१७ यांतील तरतुदीच्या अनुषंगाने मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचेकडे सुनावणी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

## रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयात रूग्णांची होत असलेली गैरसोय

**(१२) ७६६८२ (१८-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयात वैदयकीय अधिकारी, भूलतज्ज्ञ, सोनोग्राफी तज्ज्ञ, परिचर याची पदे रिक्त आहेत तसेच सिटी स्कॅन मशीन, एमआरआय मशीनही बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयात रूग्णांना उपचारासाठी लागणारी औषधदेखील बाहेरून आणण्यास सांगितले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१८) : (**१) हे अंशतः खरे आहे.
जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ (गेड पे रु.६६००/-) संवर्गाची १९ पदे मंजूर असून त्यातील ३ पदे भरलेली आहेत, वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु. ५४००/-) ची ३० पदे मंजुर असुन २४ पदे भरलेली आहेत व परिचर संवर्गाची एकुण ६ पदे मंजुर असुन ६ पदे भरलेली आहेत. तेथे १ कायमस्वरुपी भुलतज्ञ कार्यरत आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत भुलतज्ञांचे पॅनेल तयार करण्यात आले असुन त्यांचेमार्फत कॉल बेसिसवर रुग्णांना सेवा उपलब्ध करुन दिली जात आहे.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान आयपीएचएस अंतर्गत १ सोनोग्राफी तज्ञ पॅनेल तयार

करण्यात आले असून त्यांचेमार्फत आठवड्यातुन दोन दिवस रुग्णांना सोनोग्राफी सेवा दिली जाते.

सदर रुग्णालयात बंद सीटी स्कॅन मशिन निर्लेखित करुन नविन मशीन खरेदी करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत बाह्ययंत्रणेकडून सिटी स्कॅनची सेवा उपलब्ध करुन दिली जाते. सदर रुग्णालयास एमआरआय मशिन मंजुर नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (ता.जि.अमरावती) येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(१३) ७७२९२ (१५-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (ता.जि.अमरावती) येथील पर्यटन स्थळाचा विकास कामांसाठी पर्यटन विकास अंतर्गत रु.५ कोटी निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेबुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा. सार्वजनिक बांधकाम,उद्योग,पर्यावरण राज्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार या पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. संगमेश्वर, ता.जि.अमरावती येथील पर्यटन स्थळाच्या विकास कामांना पर्यटन विकासांतर्गत रुपये ५.०० कोटी निधीची तरतूद करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (पर्यटन) व मा.राज्यमंत्री (पर्यटन) यांच्याकडे निवेदन दिले आहे.

(२) संगमेश्वर, ता.जि.अमरावती या ठिकाणी संरक्षक भिंत, उद्यान सुधारणा, प्रवेश मार्गाचे सौंदर्यीकरण इत्यादी रुपये ३११.१९ लक्षच्या कामांना मंजूरी देऊन रुपये ७५.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मानखुर्द येथील चिल्ड्रेन्स एड सोसायटी अंतर्गत येणा-या मानखुर्दमधील विविध संस्थांनी महापालिकेचे पाण्याचे देयक थकविल्याबाबत**

**(१४) ८१३७१ (१९-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील चिल्ड्रेन्स एड सोसायटी अंतर्गत येणाऱ्या मानखुर्दमधील विविध संस्थांनी महापालिकेचे ५० लाख रुपये पाण्याचे देयक थकविल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी अंतर्गत मानखुर्दमध्ये चेंबूर चिल्ड्रेन्स होम, नविन बालगृह, मंदबुध्दी बालगृह व बालकल्याण विभाग या संस्था चालवल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिल्ड्रेन्स होमचे पाण्याचे देयक थकविण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी ही मुंबई विश्वस्त अधिनियम-१९५० व संस्था नोंदणी अधिनियम-१८६० अंतर्गत नोंदणीकृत आहे. सदर संस्थेस शासनाकडून वेतनासाठी १०० टक्के सहाय्यक अनुदान व प्रवेशित मुलांच्या अनुषंगाने परिपोषण अनुदान देय आहे. उर्वरित खर्च संस्थेने स्वत: निधी उभारून संस्थेचे खर्च भागविणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कारंजा (जि वाशिम) तालुक्यातील उप जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी निधीची उपलब्धता होत नसल्याबाबत

**(१५) ८१५९० (१५-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि वाशिम) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची उपलब्धता होत नसल्यामुळे सदर रुग्णालयाची कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, बांधकाम पूर्ण होत नसल्यामुळे डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या पदांना उच्च अधिकार समितीची मंजुरी मिळत नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर बांधकामाला निधीची उपलब्धता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.
कारंजा, जि. वाशिम येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयाकरीता निकषानुसार एकूण ४८ पदे निर्माण करण्यास दि. १३.०५.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.
(३) सदर बांधकामास रू. ७९९.६८ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त असून आतापर्यंत रू. ६२४.९६ लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रू. ८० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील मानखूर्द येथील बालसुधारगृहात झालेला गैरप्रकार

**(१६) ८४८८४ (१६-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मानखुर्द येथील सुधारगृहातील महिला कर्मचाऱ्याने आठ वर्षीय मुलीस उलटी चाटावयास लावल्याची घटना दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) श्रीमती. संगिता पवार, मेट्रन अतिरिक्त बालगृह मानखुर्द, मुंबई याच्याविरूध्द संस्थेचे अधिक्षक यांनी ट्रॉम्बे पोलिस ठाणे मुंबई येथे बाल न्याय(मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ७५ अन्वये गुन्हा नोंदविलेला आहे. तसेच मुख्याधिकारी, दि. चिल्ड्रेन्स एड सोसायटी, माटुंगा मुंबई-१६ यांच्या आदेशान्वये श्रीमती.संगिता पवार, मेट्रन यांना निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### माटुंगा येथील डेव्हीड ससून बालसुधारगृहातील वीज देयक न भरल्यामुळे

**वीज खंडीत झाल्याबाबत**

**(१७) ८६६२१ (१६-०८-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा येथील डेव्हीड ससून बालसुधारगृहातील १७ लाख ७० हजारांचे वीज देयक न भरल्याने बेस्टने या सुधारगृहाची वीज पूर्णपणे खंडीत केल्याने येथील मुलांना अंधारात रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, १०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन बालसुधारगृहाचे थकीत वीज बिल तातडीने माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१९) :** (१) नाही.

(२) दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी मुंबई या स्वयंसेवी संस्था संचलित डेव्हिड ससुन औदयोगिक शाळा, माहिम, मुंबई ही संस्था कार्यरत असुन वीज देयक, इमारत भाडे व तद्नुषंगिक खर्च हा सस्थेने त्यांच्या स्वनिधीमधुन अथवा त्यांना मिळणाऱ्या देणगी मधुन भागविणे आवश्यक आहे.

सदर संस्थेच्या आवारात तीन वीज मीटर असुन संस्थेच्या कार्यशाळा विभाग व इमारत क्र.२ मध्ये मुले वास्तव्यास आहेत. येथे विद्युत बील प्रलंबित नसल्याने मीटर बंद करण्यात आले नाही.

इमारत क्र.१ मधील पहिला माळा व दुसरा माळा यावर असलेले डॉर्मिटरी प्रशासकिय कार्यालय इमारत क्र.२ (येथे मुले वास्तव्यास नाहीत ) चे मीटर दि. २०/४/२०१७ रोजी बंद करण्यात आले एकुण प्रलंबित विद्युत बिल रक्क्कम रुपये १७,६९,८५८ होते. त्यापैकी दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी यांनी धनादेश क्र. ०००१३६ दि. २१/४/२०१७ रोजी रुपये ७,००,०००/- चा भरणा विद्युत विभागास करण्यात आलेला आहे व विद्युत पुरवठा सुरळीत चालु करण्यात आलेला आहे.तसेच संस्थेच्या आवारातील बंगला , स्टोअर रूमचे विज बिल प्रलंबित होते. सदर प्रलंबित रक्कम रुपये ५६० ही धनादेश क्र. ०००२९१ दि. ८/५/२०१७ रोजी विद्युत विभागास जमा करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंबरे (जि. अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात भूल देण्याची इंजेक्शन उपलब्ध नसल्याबाबत**

**(१८) ८७६६५ (१२-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरे (जि. अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेली दोन महिने (एप्रिल-मे, २०१७) भूल देण्याची इंजेक्शन उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे

काय,

(२)  असल्यास, त्यामुळे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेकरिता येणाऱ्या महिलांना भूलीचे इंजेक्शन उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३)  असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०१-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून स्थानिक पातळीवर भूल देण्याचे इंजेक्शन खरेदी करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि, माहे एप्रिल, २०१७ च्या दरम्यान सदर इंजेक्शन स्थानिकपातळीवर तसेच खाजगी औषधी भांडारामध्ये उपलब्ध नव्हते. तद्नंतर, माहे मे, २०१७ मध्ये सदर इंजेक्शन उपलब्ध झाल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र, उंबरे येथे शिबिर आयोजित करुन कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुळावा (जि. यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१९) ९३८०० (२१-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळावा (जि. यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अपु-या औषध पुरवठयामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०२-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र मुळावा, ता. उमरखेड येथे माहे मे, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत जिल्हा स्तरावरुन मुबलक प्रमाणात औषधांचा पुरवठा करण्यात आला असून सद्यस्थितीत यवतमाळ जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी मुबलक प्रमाणात औषधी साठा उपलब्ध आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडयांमध्ये बालकांना तयार कोरडा पाकिटबंद आहार देण्याचा निर्णयाबाबत**

**(२०) ९५६१४ (२६-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडयांमध्ये बालकांना दिला जाणारा गरम व ताजा पोषण आहार बंद करून खाण्यासाठी तयार कोरडा पाकिटबंद आहार देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कुपोषण निर्मुलनात अंगणवाडी कर्मचा-यांची भूमिका महत्वाची असून एकात्मिक बालविकास योजना मोठया कॉर्पोरेट कंपन्यांना सोपविण्याचे काम केंद्रशासन करणार असून या निर्णयामुळे या योजनेसाठी अंगणवाडयामध्ये काम करणा-या २६ लाख महिलांच्या रोजगारावर विपरीत परिणाम होणार आहे हे लक्षात घेता शासनाने याबाबत कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०१-२०१९) :** (१) नाही.

(२) शासनाने निविदा ही मोठया कॉर्पोरेट कंपन्यांसाठी काढलेली नसून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे महिला मंडळ/ महिला संस्था/ महिला बचतगट यांचेसाठीच काढलेली आहे. निविदेमध्यील अटी व शर्तीचे पूर्तता करणा-या महिला मंडळ/ महिला संस्था/ महिला बचतगट यांना सदर कामाचे वाटप करण्यात येते

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोर, दौंड, मुळशी, मावळ (जि.पुणे) तालुक्यातील अंगणवाडीत शिक्षण घेणा-या बालकांना पोषण आहार वेळेवर मिळत नसल्याबाबत

**(२१) ९७९५९ (२६-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर, दौंड, मुळशी, मावळ (जि.पुणे) तालुक्यातील अंगणवाडीत शिक्षण घेणा-या बालकांना एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत मिळणारा पोषण आहार वेळेवर मिळत नसल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून येथील अंगणवाडयांना पोषण आहाराचा पुरवठा करणा-या पुरवठादार संस्थेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०१-२०१९) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात आरोग्य विभागांतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांतील समस्येबाबत**

**(२२) ९८८३० (२७-१२-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात आरोग्य विभागांतर्गत असलेल्या ३० प्राथमिक आरोग्य केंद्रांत औषधांचा साठा उपलब्ध नसणे, एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी जिल्हा सर्वोपचार रुग्णालयांत यावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील रुग्णांना सर्दी, ताप, खोकला यासारख्या लहान मोठया आजारांवर प्राथमिक उपचार मिळणे आवश्यक असतानांही सर्वोपचार केंद्रात उपचारासाठी यावे लागत असल्याने रुग्णांना मोठया प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार अकोला जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोईसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही .

अकोला जिल्ह्यातील ३० प्राथमिक आरोग्य केंद्रांत गट-अ मधील एकूण ४६ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच सदर रुग्णालयांत औषधसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

सर्दी, ताप, खोकला, इ. सारख्या किरकोळ आजार ग्रस्त रुग्णांवर प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधोपचार करण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहर, उपनगर, ग्रामीण भागामध्ये बोगस वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्याबाबत**

**(२३) १०४८८५ (०४-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर, उपनगर, ग्रामीण भागामध्ये २१ बोगस वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्याची बाब तालुका समितीच्या अहवालातून माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कोणकोणत्या रुग्णालयामध्ये बोगस वैद्यकीय अधिकारी आढळून आले आणि याप्रकरणी संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णालय यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, कार्यवाहीच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०१-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे शहर, उपनगर व ग्रामीण भागातील २१ बोगस वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्याची बाब तालुका समितीच्या अहवालातून माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली नाही.

तथापि, एप्रिल, मे, २०१८ दरम्यान पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील एकूण ३ अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिकावर फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस कार्यक्षेत्रात सन २०१८ मध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम १९६१ कलम ३५, ३६ अन्वये एक गुन्हा दाखल झाला आहे. त्याबाबत पोलीस तपास चालू आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम १९६१ कलम ३३ (२) अन्वये ३ गुन्हे व कलम ३३ प्रमाणे एक गुन्हा असे एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) पुणे ग्रामीण पोलीस कार्यक्षेत्रात दाखल करण्यात आलेल्या गुन्हयांचा तपास करण्यात आला आहे. त्यानुसार शिक्रापूर येथे ३ गुन्हयांचा व जुन्नर येथे एका गुन्हयाचा तपास चालू आहे. तसेच, शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे एका गुन्हयाचा तपास पूर्ण होऊन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत**

**(२४) १०५०८४ (०४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे सन २००५ ते २०१५ या कालावधीत ८४१ तक्रारी प्राप्त झालेल्या असून ३१७ तक्रारी निकाली काढल्या असून ५२४ तक्रारीची प्राथमिक पडताळणी झालेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित प्रकरणे काढण्याबाबतची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१५-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेस प्राप्त तक्रारीच्या जलदगतीने निपटारा करण्याकरिता प्रतिमाह ४ बैठका घेण्याचा निर्णय परिषदेने घेतला आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अधिनियम १९६५ कलम २२ व १९६७ च्या नियमाच्या अधिन राहून २०१७ मध्ये गठीत झालेल्या नवीन कार्यकारणीद्वारा १२० प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७ कलम ६२ नुसार तक्रारी विहित हमीपत्रात सादर केला जात नाही. प्राप्त तक्रारींपैकी काही तक्रारींसोबत समर्थन तथा सबळ पुरावे सादर केले जात नाहीत. काही तक्रारी या परिषदेशी संबधीत नसतात.

तक्रारदारांनी सादर केलेले दस्तावेज, पुरावे प्रतीवादाचे स्वसमर्थनार्थ पाठविले जातात. प्रतिवादीकडून उत्तर लवकर प्राप्त होत नाहीत. तसेच नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांच्याविरुध्द तक्रारीची चौकशी करण्याप्रकरणी दिवाणी न्यायालयाकरिता सुनावणीसाठी लागू केलेली संहितेची अंमलबजावणी करावी लागते.

---

**अकोला (जि.बुलढाणा) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हयात आरोग्य संस्थामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निधीची रक्कम त्यांच्या ईपीएफ खात्यावर जमा करण्याबाबत**

**(२५) १०८६२१ (३१-०३-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.बुलढाणा) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हयात आरोग्य संस्थामध्ये १५ हजार रुपये मर्यादेपर्यत मानधनावर कार्यरत असलेल्या २५२ अधिकारी व कर्मचारी यांना भविष्य निधीची सुविधा लागू करण्यात येवून सन २०१७ पासून १२ टक्क्याप्रमाणे आत करण्यात आलेली रक्कम त्यांच्या ईपीएफ खात्यावर अदयाप जमा करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, २५२ एनएचएम कर्मचाऱ्यांच्या ईपीएफ त्यांच्या नावावर त्वरीत जमा करण्याबाबत तसेच सन २०१७ च्या ईपीएफ सदरहू कर्मचारी यांच्या नावावर जमा करण्यात दिरंगाई करणा-या दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी अकोला यांचे नोंदणीपत्र व सोसायटीचे पॅनकार्ड यांच्यावरील सोसायटीच्या नावात असणा-या तफावतीमूळे ईपीएफ चे स्वतंत्र खाते उघडण्यास विलंब झाला.त्यामूळे अधिकारी व कर्मचारी यांची एप्रिल, २०१७ च्या वेतनातून १२ टक्के प्रमाणे ईपीएफ ची कपात करण्यात आलेली रक्कम संबंधितांच्या ईपीएफ खात्यावर जमा करणे शक्य झाले नाही.

तथापि दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी ईपीएफ चे स्वतंत्र खाते उघडल्यानंतर एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीच्या प्रलंबित ईपीएफ चा भरणा संबंधितांच्या ईपीएफ खात्यामध्ये मार्च, २०१८ मध्ये करण्यात आलेला आहे.

(२) या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत अकोला जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी जिल्हा लेखा व्यवस्थापक यांना कारणे दाखवा नोटीस बजाविलेली आहे.तसेच ईपीएफ चा भरणा वेळेवर करण्याबाबत राज्यस्तरावरून सर्व कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धामणगांव बढे (ता.मोताळा,जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२६) १११४८३ (२७-०२-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामणगांव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेश्या प्रमाणात औषध उपलब्ध नसल्याने व रिक्त पदांमुळे तसेच येथील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या गैरकारभारामुळे या आरोग्य केंद्राची दुरवस्था झाली असल्याने रूग्णांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वैद्यकीय अधिकाऱ्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हा परिषद प्रशासनाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध उपलब्ध करुन देण्यासह येथील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच गैरकारभार करणाऱ्या वैद्यकीय अधिका-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०१-२०१९) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधीसाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून वैद्यकीय अधिका-याची दोन्ही पदे तसेच इतर कर्मचा-यांच्या मंजुर १५ पदांपैकी १३ पदे भरली आहेत. त्यांच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा प्रदान केल्या जात असल्याने रुग्णांची गैरसोय होत नाही. केंद्र सुस्थितीत आहे.

प्राप्त तक्रारीनुसार वैद्यकीय अधिका-याच्या गैरकारभाराची चौकशी जिल्हास्तरावर करण्यात आली असून त्यांच्या विरुध्द नियमानुसार कारवाई प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहेरी (जि. चंद्रपूर) उपविभागातील अनेक गावांत पाणी टंचाई दूर करण्याकरिता प्राणहिता नदीवर लघु धरणाचे बांधकाम करण्याबाबत**

**(२७) ११३०२७ (०४-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि. चंद्रपूर) उपविभागातील अनेक गावांत असणारी पाणी टंचाई दूर करण्याकरिता प्राणहिता नदीवर पाच फूटाचे लघु धरणाचे बांधकाम करण्याची मागणी अहेरी जिल्हा निर्माण कृती समितीच्या वतीने तहसिलदार यांच्याकडे दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२१-१२-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) प्राणहिता नदीची लांबी सुमारे ११३ कि.मी. असून या नदीचे खोरे १०१०७८ चौ.कि.मी. आहे. या नदीचे पात्र फार मोठे असून अहेरी तालुक्यात सदर नदीचे पात्र ९०० ते ११०० मी.पेक्षा जास्त आहे. त्यामुळे या नदीवर लहान बंधाऱ्यांचे (० ते ६०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमतेचे ) करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मानसिक आरोग्य प्रमाणपत्र देण्यास बीयुएमएस पदविकांच्या अधिकाराबाबत**

**(२८) ११३०५१ (०४-०४-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, डी एन रोड, फोर्ट, मुंबई-१ या प्रथितयश संस्थेने बोनेल एडरीच मिरांडा, १४ श्रीराम कॉम्प्लेक्स, वसई रेल्वे स्टेशन, वसई यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी पत्रान्वये, एखाद्या व्यक्तीस चांगले मानसिक आरोग्य

(good mental health) प्रमाणपत्र देण्यास डॉ.हिमांशू बर्वे हे अर्हताप्राप्त आहेत काय, या विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात (पत्र क्र. एमसीआयएम ८/२/२०१७) मृत्यू प्रमाणपत्र देण्याचा अधिकार असल्याचे नमूद करून वस्तुस्थिती लपविण्याचा प्रयत्न केला गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.हिमांशू बर्वे हे केवळ बीयूएमएस पदविका प्राप्त असतानाही त्यांनी एका वयोवृद्ध व्यक्तीचे मृत्यूपत्रास साहाय्य होणेसाठी तिस चांगले मानसिक आरोग्य प्रमाणपत्र कोणत्या अर्हते आधारे जारी केले,

(३) असल्यास, सदरचे चांगले मानसिक आरोग्य प्रमाणपत्र देण्याचा अधिकार बीयुएमएस पदविका प्राप्त डॉ. बर्वे यांना आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशीअंती दोषितांवर कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा भविष्यात प्रस्तावित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती?

**श्री. गिरीष महाजन (१५-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) डॉ. हिमांशु बर्वे यांची अर्हता बी.यु.एम.एस. नसून बी.ए.एम.एस. आहे. सदर आरोग्य प्रमाणपत्र हे महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३४ (१) व कलम २५ (iii) नुसार देण्यात आले आहे.

(३) डॉ.हिमांशु बर्वे यांची अर्हता बी.यु.एम.एस केले नसून बी.ए.एम.एस.असल्याने त्यांना सदर प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे.

(४) चौकशी वा कारवाईचा प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## सोलापूर येथील लघुसिंचन (जलसंधारण) विभागातील नित्कृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्याबाबत

**(२९) ११४१६३ (०७-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील लघुसिचंन (जलसंधारण) विभागात कार्यरत असलेले उपविभागीय अधिकारी आणि तत्कालीन शाखा अभियंता श्री.सुजित कोरे यांनी गेल्या अनेक वर्षापासून सोलापूर जिल्हयात बनावट कागदपत्राच्या आधारे ठेकेदाराच्या नावांनी स्वत: काम करून शासनाची करोडो रूपयांची फसवणूक केली असून त्यात ल.पा.तलाव दुधनी, पा.तलाव शिरवळ, तानवडे शेत (ता. अक्कलकोट) सातलाव भातंबरे व सासूरे तसेच को.प.बंधारा हत्तीज (ता. बार्शी व पंढरपूर) याकामाचा समावेश असून यासह जवळपास ५८ कामे श्री. सुजित कोरे यांनी पदाचा

दुरुपपयोग करून केलेली असून याशिवाय अनेक कामे ते करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियंता सुजित कोरे यांच्या देखरेखी खाली झालेल्या नित्कृष्ट दर्जाच्या कामाची पाहणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली असता त्यात कोरपळे, कळंदवाडी (पा) व तळवदे येथे केलेल्या सात बंधाऱ्याची कामे अत्यंत नित्कृष्ट दर्जाची झाली असून रेती आणि सिमेंट कमी वापरले असून दगड जास्त प्रमाणात वापरल्याने सातही बंधाऱ्यास मोठमोठे भेगा गेल्याचे आढळून आले असून एम.बी रेकार्डमध्ये खोटया नोंदी करून जास्त मोजमाप दाखवून बनावट देयकेच्या आधारे करोडो रूपयांची उचल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाखा अभियंता आणि उपविभागीय अभियंता या पदावर सोलापूर जिल्हयातच १० ते १५ वर्षापासून कार्यरत असून इतरत्र बदली झाल्यास काही दिवसातच परत सोलापूर जिल्हयात येवून काम करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अभियंता श्री.कोरे यांनी केलेल्या गैरप्रकाराची, नित्कृष्टदर्जाच्या कामाची, बोगस व बनावट कागदपत्राच्या आधारे शासनाची फसवणूक करून करोडो रूपयांचे उचल केल्याबाबतच्या अनेक तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व गंभीर प्रकरणाची शासनाने उचस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,
(६) असल्यास, त्यानुसार सदर प्रकरणी संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कोरपळे कळंबवाडी (पा) व तडवळे येथील ७ बंधाऱ्याच्या कामांची कार्यकारी अभियंता (जलसंधारण), सातारा व कार्यकारी अभियंता (जलंसधारण), सांगली यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करुन चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी यांचे अहवालानुसार तक्रारींत तथ्य आढळून येत नाही.
(३) श्री. कोरे हे शाखा अभियंता म्हणून सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट, मोडनिंब व पंढरपूर या पदांवर अनुक्रमे ९ वर्षे १० महिने, ३ वर्षे ३ महिने व ३ महिने कार्यरत होते तसेच उप विभागीय अभियंता म्हणून उस्मानाबाद येथे ३ महिने व सोलापूर येथे ३ वर्षे कार्यरत होते.
(४), (५), (६) व (७) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने श्री. कोरे यांनी केलेल्या कामांची कार्यकारी अभियंता (जलसंधारण), सातारा व कार्यकारी अभियंता (जलंसधारण), सांगली यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करुन चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी यांचे अहवालानुसार तक्रारींत तथ्य आढळून येत नाही.

श्री. कोरे यांच्या विरुध्द करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून येत नसले तरी त्यांचेविरुध्द करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची मृद व जलसंधारण विभागांतर्गत सोलापूर जिल्हयाबाहेर दिनांक १४.५.२०१८ च्या आदेशान्वये बदली करण्यात आली आहे

---

**तारकर्ली खाडीपात्रातील (जि. सिंधुदुर्ग) “सिंधुकन्या” हाऊसबोटीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३०) ११४६०५ (१०-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारकर्ली खाडीपात्रात (जि.सिंधुदूर्ग) येथे महाराष्ट्र पर्यटन महामंडळाची सुमारे दीड कोटी रुपये खर्चून उभारलेली "सिंधुकन्या' हाऊसबोट तारकर्ली खाडीपात्रात (जि.सिंधुदूर्ग) येथे पडलेल्या छिद्रांची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ प्रशासनाकडून वेळेत दुरुस्ती न झाल्यामुळे सदर बोट जलसमाधी मिळण्याची स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तारकर्ली खाडी परिसरात सिंधूकन्या बोटीसह सावित्री, हिरण्यकेशी व कर्ली या हाऊसबोट सेवेत होत्या. मात्र सुधारणा व दुरुस्तीच्या नावाखाली हिरण्यकेशी व कर्ली या हाऊसबोट वर्षभरापूर्वी खाडी किनाऱ्यावर ठेवण्यात आल्या असून पर्यटकांच्या सेवेसाठी केवळ सावित्री ही एकमेव बोट कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून दुरुस्तीची कामे वेळेत न करणाऱ्या संबधित अधिका-यावर कारवाई करावी अशी मागणी तारकर्ली गांवचे माजी सरपंच व ग्रामस्त यांनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिका-याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासह सिंधुकन्या हाऊसबोटची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या तारकर्ली येथील सिंधुकन्या हाऊसबोटीला छिद्रे पडल्याने दुरुस्तीकरिता पाण्याबाहेर काढतेवेळी खाडीतील गाळात रुतली. सदरची हाऊसबोट पाण्याबाहेर काढणेची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) सिंधुकन्या हाऊसबोट छिद्रे पडल्याने दुरुस्तीकरिता पाण्याबाबहेर काढतेवेळी गाळात रुतल्यामुळे सागरी सल्लागार यांच्या मार्गदर्शनाखाली पाण्याबाहेर काढण्यासाठी बचाव कार्याकरिता निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून त्याकरिता येणाऱ्या खर्चाकरिता विमा कंपनीकडे दावा करण्यात आला. विमा संचालनालयाने सदर हाऊसबोट खाडीतून हलविण्याचे मान्य केले आहे. तसेच सदर खर्च मोठ्या प्रमाणात अपेक्षित असल्याने सागरी सल्लागारांच्या सल्ल्याने wreck करुन बाहेर काढण्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची परवानगी घेण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करुन महामंडळाने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत सदर सिंधुकन्या हाऊसबोट पाण्याबाहेर काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील बाई गंगाबाई रुग्णालयातील रक्त संकलन पेढीबाबत**

**(३१) ११५७२२ (०६-०४-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील बाई गंगाबाई स्त्री रूग्णालय येथे शासकीय रक्त संकलन पेढी परवान्याविनाच कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्तपेढी नुतनीकरण न करताच कार्यरत असून यावर शासनाने कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सदरच्या रक्तपेढीस परवाना क्रमांक ND/२७ दिनांक २९.०३.२०१२ अन्वये परवाना प्राप्त झालेला आहे. सदरचा परवाना दिनांक २८.०३.२०१७ पर्यंत वैद्य होता. त्यानंतर रक्तपेढीने दिनांक २९.०३.२०१७ ते २८.०३.२०२२ परवान्याचे नुतनीकरण अन्न व औषध प्रशासन नागपूर यांचेमार्फत करुन घेतलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वैद्यकीय क्षेत्रातील कट प्रक्टिस विरोधात कायदा करण्याबाबत**

**(३२) ११६११४ (०५-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय क्षेत्रात कमिशन साठी सर्वसामान्य जनतेची पिळवणूक होत असल्याने शासनाने याला आळा घालण्यासाठी कट प्रक्टिस कायदा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्याचे स्वरूप काय आहे तसेच कायदा तयार करण्याबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, कायद्याची अंमलबजावणी करण्यास अजून किती कालावधी लागणार आहे?

**श्री. गिरीष महाजन (१५-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि. १९.०७.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार मा.मंत्री (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली कायद्याच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा करण्याकरिता ५ मंत्र्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने रद्द केलेल्या कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधण्याच्या योजनेची निविदा प्रक्रियाबाबत**

**(३३) १२११४२ (२३-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने रद्द केलेल्या कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधण्याच्या योजनची प्रशासकीय मान्यता पुर्नजिवित करून निविदा प्रक्रिया पुन्हा राबविण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंधारण मंत्री यांना दिनांक ३ फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनात केलेल्या मागणीनुसार जलसंधारण महामंडळाने रद्द केलेल्या पाटोदा व शिरूर तालुक्यातील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधण्याच्या योजनेची प्रशासकीय मान्यता पुर्नजिवित करून निविदा प्रक्रिया पुन्हा राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०१-२०१९) :** (१) ॲड. भमराव आनंदराव धोंडे (आष्टी), विधानसभा सदस्य यांनी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांना दिनांक २/२/२०१८ अन्वये निवेदन दिलेले आहे.

(२) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ कार्यालयाने रद्द केलेल्या शिरुर व कोळवाडी को.प.ब. या कामांना जलयुक्त शिवार किंवा शासन निधीतुन नव्याने प्रस्तावीत करण्याबाबत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ कार्यालयाने दि.०३/०८/२०१८चे पत्रान्वये मुख्य अभियंता, पुणे यांना कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांनी या दोन योजनांचे नव्याने प्रशासकीय मान्यता घेणेबाबत प्रस्ताव दि.१५/१०/२०१८ चे पत्रान्वये प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, औरंगाबाद यांना सादर केला आहे. अंबरविहिरा साठवण तलाव योजनेचा अशा प्रकारे नविन प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, बीड यांना दिल्या आहेत. या रद्द योजनांना पुनश्च प्रशासकीय मान्यता घेऊन त्यांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

(३) कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृती योजने अंतर्गत कौटूंबिक उत्पन्नाची मर्यादा वाढविणेबाबत**

**(३४) १२४४३१ (०४-०८-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस. आणि बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृती योजने

अंतर्गत (ईबीसी) कौटूंबिक उत्पन्न मर्यादा रु,८,००,०००/- (आठ लाख) करण्याबाबत मागणी मराठा मोर्चा समन्वय संघटनेकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत कौटुंबिक उत्पन्नाची मर्यादा रुपये ८ लाख इतकी करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मालाड, मुंबई येथील वन विभागाच्या अखत्यारितील अवैध बांधकामाबाबत**

**(३५) १२४७५२ (३०-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मालाड, मुंबई येथील वन विभागाच्या अखत्यारितील सर्वे क्र. २३९ अंतर्गत बेकायदा जलवाहिनी व विद्युत वाहिनी टाकली जात असल्याची तक्रार नव जीवन समाज सेवा संघ, पठाणवाडी मालाड, मुंबई या संस्थेतर्फे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई यांचेकडे दिनांक ०२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाच्या या संरक्षित क्षेत्रात अशाप्रकारे जलवाहिनी, विद्युतवाहिनीचे काम करण्यास मा. उच्च न्यायालयाने मनाई केलेली असून त्यासंदर्भात तक्रार दाखल होऊनही अवैध बांधकाम हटविण्याकडे वनविभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदा जलवाहिनी, विद्युतवाहिनी उभारण्याचे प्रकार या पुर्वीही करण्यात आले असून त्यावेळी दोन आरोपीकडून लेखी हमी घेवून त्यांना सोडून देण्यात आले होते, हे खरे आहे काय;
(४) असल्यास,यास जबाबदार असणा-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०१-२०१९) :** (१) मालाड (पूर्व) सर्व्हे क्रमांक २३९ मध्ये पाईप लाईन व लाईट केबल टाकल्याबाबत नव जीवन समाज सेवा संघ, पठाण वाडी, मालाड, मुंबई यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांचेकडे तक्रार केली आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये काही कामे वन क्षेत्रात तर काही कामे वन क्षेत्राबाहेर केल्याचे निदर्शनास आले आहे.

वनक्षेत्रामध्ये वन विभागाची परवानगी न घेता पाणी पुरवठ्याकरीता नवीन पाईपलाईन टाकल्याचे निदर्शनास आले असता जागेवर जावून ३० पाईप नग जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) मालाड (पूर्व) सर्व्हे क्रमांक २३९ मधील क्षेत्रात मागील दोन वर्षात ६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून यापैकी दोन गुन्ह्यांमधील तपासाअंती मा. महानगर न्यायदंडाधिकारी, बोरीवली यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदर तक्रारीतील आरोपी श्री. वैभव भराडकर यांना अटक करण्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीनुसार बंधपत्रावर मुक्त करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात पेट्रोल-डिझेल, घरगुती वापराच्या गॅसच्या किंमतीत होत असलेली भाववाढ रोखण्याबाबत**

**(३६) १२६७५९ (०४-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: धुळे जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल व घरगुती वापराच्या गॅसच्या किंमतीत सतत होणारी भाववाढ रद्द करावी व इतर विविध मागण्यांसाठी दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास धुळे जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयासमोर नागरीकांनी आंदोलन तसेच दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास देशात बंद पुकारण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेट्रोल-डिझेलच्या किमंतीवर शासनाकडून कर व कमिशन आकारण्यात येत असल्यामुळे इंधनाच्या किंमतीत वाढ होऊन रोजच्या वापरातील गृहपयोगी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ झाल्याने शासनाने कर व कमिशन रद्द करावा अशी मागणी नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पेट्रोल-डिझेल, घरगुती वापराच्या गॅसच्या किंमतीत केलेली भाववाढ रोखण्यासह कर व कमिशन रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-१२-२०१८) :** (१), (२) व (३) १० सप्टेंबर २०१८ रोजी पेट्रोल-डिझेल दरवाढीबद्दल बंद पुकारणात आला होता, हे खरे आहे.
राज्य शासनाने दि.५ ऑक्टोबर, २०१८ पासून पेट्रोलवरील कर रु.१.८८ प्रति लिटर व दि.६ ऑक्टोबर, २०१८ पासून डिझेलवरील कर रु.१ प्रति लिटर कमी केला. पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत झालेली भाववाढ कमी करण्यासाठी केंद्र शासनाने दि.४ ऑक्टोबर, २०१८ रोजी पेट्रोल व डिझेलवरील उत्पादन शुल्क रु.१.५० प्रति लिटर कमी केले. तसेच केंद्र शासनाने ऑईल मार्केटिंग कंपन्यांना आधारभूत किंमत रु.१ प्रति लिटर कमी करण्यास सांगितले. पेट्रोल व डिझेलवरील किंमतीवर कमिशन आकारण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.
(४) लागू नाही.

---

## नाशिक येथील बालसुधार गृहाच्या अधिक्षक पदावर प्रतिनियुक्तीने करण्यात आलेली नियुक्ती नियमबाहय असल्याबाबत

**(३७) १२७१९९ (०६-१२-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक परिसरातील उंटवाडी रोडवरील बालसुधारगृहाच्या अधिक्षक श्रीमती नलिनी पाटील या परिविक्षा अधिकारी म्हणून ठाणे येथे कार्यरत असतांना त्यांची पदोन्नतीने नागपूर येथे जिल्हा परिविक्षा अधिकारी म्हणून बदली करण्यात आलेली असता अवघा दोन महिन्यातच त्यांची प्रतिनियुक्तीने नाशिक येथील बालसुधारगृहाच्या अधिक्षक पदावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमबाह्यपणे प्रतिनियुक्ती करण्यात आले असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक येथील बालसुधारगृहातील विधीसंघर्षीत बालकास बालन्याय मंडळातून जामीन करुन घेण्यासाठी तसेच पीओ लेटर देण्याकरीता कॅरम बोर्डाची मागणी करण्या-या श्रीमती नलिनी पाटील यांच्यासह लिपीक श्री प्रशांत देसले यां दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार या दोन्ही प्रकरणात सामील असलेल्या संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१९)** : (१) महिला व बाल विकास आयुक्तालयाचे आदेश क्र ४०८६ दिनांक १८-७-२०१७ अन्वये श्रीमती नलीनी पाटील,परिवीक्षा अधिकारी,जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,ठाणे यांना पदोन्नतीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,नागपुर या कार्यालयात पदस्थापना देण्यात आलेली होती.

श्रीमती नलीनी पाटील यांनी अर्ज दि २७-७-२०१७ नुसार त्यांच्या कौटुंबीक व आरोग्याविषयक अडचणी विचारात घेवुन त्यांना नाशिक येथे कामकाजव्यवस्थेने नियुक्ती करण्याबाबत आयुक्तालयास विनंती केलेली होती.

जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना संचलीत मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह उंटवाडी रोड,नाशिक या कार्यालयातील परिवीक्षा अधिकारी हे पद दिनांक ३०-६-२०१७ पासुन रिक्त होते.

जिल्हा परिवीक्षा अधिकारी हा संवर्ग अत्यावश्यक सेवेशी संबधीत आहे.त्यामुळे जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना संचलीत मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह उंटवाडी रोड,नाशिक या संस्थेतील कामकाज सुरळीतपणे पार पडण्याच्या अनुषंगाने तसेच श्रीमती पाटील यांच्या कौटुंबीक अडचणी विचारात घेवुन आयुक्तालयाचे आदेश क्र ४६५४ दि १०-८-२०१७ अन्वये श्रीमती पाटील यांची कामकाजव्यवस्था जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना संचलीत मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह उंटवाडीरोड,नाशिक या कार्यालयात करण्यात आलेली होती.

(२) होय,

पोलीस निरीक्षक ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांचे पत्र क्र २३३/२०१८ दि २३-१-२०१८ नुसार नाशिक येथील बालसुधारगृहातील विधीसंघर्षीत बालकास बालन्याय मंडळातुन जामीन करुन घेण्यासाठी तसेच पीओ लेटर देण्यासाठी कॅरम बोर्डाची मागणी करुन ते स्विकारणाऱ्या श्रीमती नलीनी पाटील यांच्यासह लिपीक श्री प्रशांत देसले या दोघांना लाचलुचपत विभागाच्या पथकाने दि २१-८-२०१८ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आलेली आहे.

(३) श्रीमती नलीनी पाटील यांची नागपुर येथुन नाशिक येथे कामकाजव्यवस्था शासकीय कामकाजाच्या आवश्यकतेनुसार तसेच त्यांच्या कौटुंबीक अडचणीच्या अनुषंगाने करण्यात आलेली असल्याने सदर प्रकरणी अद्याप चौकशी करण्यात आलेली नाही.

महिला व बाल विकास आयुक्तालयाचे आदेश क्र ५०४९ दि ३०-८-२०१८ अन्वये श्रीमती नलीनी पाटील यांना दि २२-८-२०१८ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील आदेशापर्यंत निलंबीत करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशी आयुक्तालयस्तरावरुन प्रस्तावित आहे.

श्रीमती पाटील यांचेवर लाच घेतल्याप्रकरणी दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक यांचेस्तरावर करण्यात येत आहे.

श्री. प्रशांत देसले हे संबधीत निरीक्षणगृहाचे कर्मचारी आहेत. संबधीत संस्थेचे मानद सचिवांचे आदेश क्र मुनिगृना/प्रशांत देसले/निलंबन/९४/२०१८दि ३-९-२०१८अन्वये श्री. प्रशांत देसले यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोहा ( जि.नांदेड ) येथे मोर संवर्धन केंद्रासाठी जागा देण्याबाबतचा प्रस्ताव

**(३८) १२७२०१ (०६-१२-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील श्री.डी.आर. पवार यांनी स्वतःच्या मालकीची दोन एकर जागा मोर संवर्धन केंद्रासाठी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पवार यांनी संगोपन व संवर्धनासाठी (१४६ हेक्टर) ३६५ एकर गायरान व मालकी जागेचा नकाशा वन विभाग, नांदेड यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोर संवर्धन केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रा. डी. आर. पवार रा. रामदास तांडा, ता. लोहा, जि. नांदेड यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मानद वन्यजीव रक्षक, नांदेड यांचेमार्फत तपासणी करण्यात आली आहे. त्यांचे अहवालानुसार सदर क्षेत्र हे मोरांचे संवर्धनासाठी व वनस्पती उद्यानासाठी योग्य नसल्याचे उपवनसंरक्षक, नांदेड यांनी दिनांक १२.१२.२०१७ रोजी प्रा. डी. आर. पवार यांना केळविले आहे.

तद्नंतर प्रा. डी. आर. पवार यांनी सदर क्षेत्र संरक्षित वनक्षेत्र म्हणून घोषित करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार सदर क्षेत्र पक्ष्यांसाठी अभयारण्य / राखीव संवर्धन घोषित करण्याच्या अनुषंगाने सर्व महसूली व गायरान क्षेत्राची तपासणी करणे व लोकप्रतिनिधी यांचेशी सल्लामसलत करणेबाबतची कार्यवाही उपवनसंरक्षक, नांदेड यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात वन्य प्राण्यांपासून शेतपिकांचे होत असलेले नुकसान

**(३९) १२८०१२ (०७-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्य प्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान होत असल्याने शासनाने शेतपिकांच्या संरक्षणाकरीता शेताला कुंपण घालून द्यावे वा शेतकऱ्यांना कुंपणासाठी १०० टक्के अनुदान

द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांच्या एका संघटनेने मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १ ऑक्टोबर,२०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील उसरण (ता.मेहकर) येथील शेतकऱ्यांचे शेतपीकाचे वन्य प्राण्यांकडून नुकसान झाले असून पिंपळगाव सराई या गावच्या सर्व बाजूने वनविभागाचे जंगल असल्याने रोही व हरीण हे वन्यप्राणी शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटनाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार राज्यात वन्यप्राण्यामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाईची रक्कम विनाविलंब मिळण्यासह शेतपीकाच्या संरक्षणसाठी शेतपीकाला कुपंण घालून दयावे वा कुंपणासाठी १०० टक्के अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बुलढाणा जिल्हयातील मौजे उसरण (ता. मेहकर) व पिंपळगाव सराई पैकी पिंपळगाव सराई येथे वन्यप्राण्यांनी शेतपिकाचे नुकसान केल्याची ३० प्रकरणे निदर्शनास आली आहेत. प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार उक्त प्रकरणामध्ये संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(४) वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे नुकसान टाळण्याकरीता क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

• शेतपिक नुकसान करणारे वन्यप्राणी निलगाय व रानडुक्कर यांना पारध करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२.०५.२०१५ अन्वये अटी सुलभीकरण करण्यात आलेले आहे.

• डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजने अंतर्गत वन्यप्राण्यांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी लोखंडी जाळीचे कुंपण उभारण्याची योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे.

• वन्यप्राण्यांमुळे शेतपिक व फळझाडाचे नुकसान प्रकरणी अदा करावायाच्या अर्थसहाय्यात वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे.

• शेतपिकाचे नुकसान झाल्यास त्याची शहानिशा करणे, पंचनामा करणे, नुकसान क्षेत्राची मोजणी करणे, पुरावे तपासणे व नुकसनीचे मुल्य ठरविणे इत्यादी कार्यवाहीस होणारा विलंब टाळण्यासाठी व पंचनाम्यात सुलभता येण्यासाठी तसेच प्रत्यक्षात बाधीत शेतक-यांना देय अर्थसहाय्य तत्परतेने देणे शक्य व्हावे म्हणुन अवलंबविण्यात येणाऱ्या पध्दतीमध्ये सुधारणा शासन निर्णय दि. २८.०९.२०१५ अन्वये करण्यात आली आहे.

• पिक फळझाडाचे नुकसान प्रकरणात नुकसान भरपाईच्या तात्काळ अदा करण्याकरिता सदर विषय राज्य सेवा हक्क कायदयामध्ये समाविष्ट करून सेवा Online करण्यात आली आहे.

• वन्यप्राणी वनक्षेत्राच्या बाहेर येवू नये म्हणून वनक्षेत्रात त्यांना पिण्याकरीता पानवठे तयार करण्यात आलेले असुन जलसंधारण व मृद संधारणीची कामे हाती घेण्यांत येतात.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**ब्रम्हपूरी ( ता.मेहकर, जि. बुलढाणा ) येथील पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४०) १२८०८१ (०५-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (ता.मेहकर, जि. बुलढाणा ) येथील पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामासाठी एकही पैसा खर्च न करता ५ लाख रुपये निधीचा अपहार झाला असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार याप्रकरणात दोषी असणा-या संबधितावर कारवाई करण्यासह सदर पाझर तलावाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) या प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.

मौजे ब्रम्हपुरी येथील तलाव ऑगस्ट, २०१६ मधील अतिवृष्टीमध्ये फुटण्याच्या बेतात असताना तलावाचे मजबुतीकरणाचे काम करण्यात आले. त्यानंतर दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करून गाव तलावाचे काम जि.प. सेस फंड २०१७-१८ अंतर्गत मंजुर करण्यात येवून त्यावर रु.४,९७,५००/- इतका खर्च करण्यात आला आहे.

तथापि, फ्लॅक वॉल व बार वॉल चे काम देयक पारित झाल्यानंतर करण्यात आल्याचे चौकशीअंती निदर्शनास आल्याने उपविभागीय जलसंधारण अधिकारी तथा शाखा अभियंता यांचेवर विभागिय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत सांडवा बांधकाम फ्लॅक वॉलसह पुर्ण झालेले असुन भराव काम सुध्दा पुर्ण झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासन अधिकारी-कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोग लागू करण्याबाबत**

**(४१) १२८१८० (०५-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी अधिकारी-कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाचा वेतनलाभ माहे जानेवारी, २०१९ पासून देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार कशा प्रकारे थकित रक्कम देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याकरिता किती कोटी रुपयांचा भार शासनाच्या तिजोरीवर पडणार आहे,

(४) असल्यास, त्यानुसार सातवा वेतन आयोगचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन सुधारणेच्या अनुषंगाने दि.१.१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीतील देय थकबाकी रु.३८६५५/- कोटी पुढील आर्थिक वर्ष २०१९-२०२० पासून ५ वर्षात ५ समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधी व प्रकरणपरत्वे उचित निवृत्तिवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच निवृत्तिवेतन सुधारणेच्या अनुषंगाने अनुज्ञेय थकबाकी पुढील आर्थिक वर्ष २०१९-२०२० पासून ५ वर्षात ५ समान हप्त्यांत रोखीने अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दि.१ जानेवारी,२०१९ पासून प्रत्यक्ष लाभ देण्याचा निर्णय दि.२७.१२.२०१८ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. राज्य वेतनसुधारणा समितीच्या शिफारशी स्विकारण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सुधारित वेतश्रेण्यासंदर्भातील शासन अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रतीक्षा यादीत असलेल्या उमेदवारांना शासकीय नोकरीपासून वंचित राहावे लागल्याबाबत**

**(४२) १२८१८९ (०५-१२-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वित्त विभागाच्या दिरंगाईमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची ‘कर सहाय्यक’ पदासाठी परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रतीक्षा यादीत असलेल्या ४२ उमेदवारांना शासकीय नोकरीपासून वंचित राहावे लागल्याची बाब दिनांक २४, जुलै २०१८ वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त विभागाच्या दिरंगाईमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी सदर उमेदवारांनी मा. मुख्यमंत्री तसेच मा. वित्त मंत्री यांना माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विनंतीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०१-२०१९) :** (१), (२) व (३) सदर विषयावर लेखी निवेदन दि.१७ जुलै, २०१८ रोजी प्राप्त झाले आहे. कर सहायक परीक्षा २०१६ च्या प्रतीक्षायादीतील उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत वित्त विभागाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दि.१७.३.२०१८ च्या पत्रान्वये विनंती केली होती. परंतु प्रतिक्षायादीचा एका वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्याने व्यपगत

झाली असल्याने सदर विनंती आयोगाने नाकारली होती. दि.१६.५.२०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये आयोगास पुन्हा एकदा विनंती करण्यात आली होती. मात्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने वरील कारणामुळे प्रतीक्षायादीतील उमेदवार उपलब्ध करुन देता येत नसल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**विदर्भातील अभयारण्यासह बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांचे संरक्षण करणेबाबत व पर्यावरणाचा होणारा -हास रोखण्याबाबत**

**(४३) १२८४५० (०६-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील पेंच, बोर, उमरेड-क-हांडला व ताडोबा या अभयारण्यत वनविभागाचे अधिकारी वन्यप्राण्यांच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष करित असल्यामुळे तेथे वाघ, बिबट व इतर वन्यप्राण्यांची शिकार व अपघाती मृत्यू होण्याची संख्या वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुंबईतील बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रस्त्यावरुन भरधाव वाहनांखाली प्राणी येऊन दुर्घटना घडल्याच्या घटना घडत असून सदर उद्यानात एका बिबट्याचा मृत्यू होवून दुसरा बिबट्या अत्यवस्थ असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार उक्त अभयारण्यातील व राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्याच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष करण्या-या वन विभागाच्या अधिकारी व कर्मचा-यावर कारवाई करण्यासह वन्य प्राण्यांचे संरक्षण करणेबाबत व पर्यावरणाचा -हास रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

विदर्भातील पेंच, बोर, उमरेड-कऱ्हांडला, व ताडोबा या संरक्षित क्षेत्रात सन २०१५ मध्ये एक बिबट्याचा, सन २०१६ मध्ये एक वाघाचा अपघाताने, सन २०१७ मध्ये एक वाघाचा शिकारीने तर सन २०१८ (ऑक्टोबर, पर्यंत) दोन बिबट्या मृत्यु अपघाताने झाला आहे.
(२) तुंगारेश्वर हायवेवर दिनांक २४.०२.२०१७ रोजी एक बिबट, घोडबंदर लगत नॅशनल हायवेवर दिनांक ०१.१०.२०१७ रोजी एक बिबट व कामण-भिवंडी राज्य महामार्गावर एक बिबट रस्ते अपघाताने मृत्यु पावले आहे.

तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबट अपंगालयामध्ये दिनांक ११.०९.२०१८ रोजी एक व दिनांक १७.०९.२०१८ रोजी एक अशा दोन बिबट्यांचा विषबाधेने मृत्यु झाला आहे.

(३) व (४) रस्ते अपघातात बिबट मृत्यु पावण्याच्या घटना ह्या रात्रीच्या वेळेस झाल्याचे निदर्शनास आले असून प्रस्तूत प्रकरणामध्ये वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सन २०१७ मधील पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघाच्या शिकार प्रकरणात चौकशीअंती एकुण १७ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

वन्यप्राण्यांच्या संरक्षण व संवर्धनाकरीता क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रामणे उपाययोजना करण्यात येतात.

• वन्यप्राणी, वाघ शिकार प्रकरणामध्ये गुन्हेगाराचा छडा लावण्याच्या दृष्टीने Call Detail Record चा उपयोग केला जात आहे.

• स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण करण्यांत येते, याकरिता साधन सामुग्री जसे कॅमेरा ट्रॅप, दुर्बिण व जीपीएस यांचा वापर करण्यांत येतो.

• सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वीत असून तात्काळ संपर्काकरीता वाहनांवर वायरलेस संच बसविण्यांत आलेले आहेत. क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांना वॉकी टॉकी संच पुरविण्यांत आलेले आहेत.

• वन्यप्राणी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्यांकडे फिरकू नये, त्यांना वनातच पिण्यांचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव / खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे, (सिमेंट टाके बांधणे) इत्यादी उपाययोजना करण्यांत आलेल्या आहेत.

• वनाच्या सिमेलगत असलेल्या तोंडी नसलेल्या विहिरींना कठडे करण्यांत आले आहे.

• व्याघ्र प्रकल्पाच्या वनक्षेत्रातुन गेलेल्या विदयुत लाईनवर गस्त करण्यांत येते

• अपघाती मृत्युला आळा घालण्यासाठी वाहतुकीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत गतीरोधक व विविध ठिकाणी वेग मर्यादा पालन करण्याच्या सुचना फलक लावण्यांत आलेले आहे.

• लोकांनी जंगलात जाऊन मानव-वन्यजीव संघर्ष होऊ नये म्हणुन उपलब्धतेनुसार गावकऱ्यांना निस्तार दरावर फाटे, बांबू व सरपण उपलब्ध करुन देण्यांत येते.

• ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून विविध योजनेतून एलपीजी गॅसचा पुरवठा करण्यांत आला आहे.

• जिल्हा व्याघ्र कक्ष समितीची स्थापना करण्यांत आलेली असून त्यामध्ये मानव वन्यजीव संघर्षाच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात येतो.

• रॅपिड रिस्पॉन्स चमूची स्थापना करण्यांत आलेली असून त्यांना सर्व साहित्यासह वाहन उपलब्ध करुन देण्यांत आले आहेत. सदर चमूव्दारे सतत गस्ती करुन मानव वन्यजीव संघर्ष रोखण्याचे कार्य करण्यांत येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्य प्रशासनात मानधनावर पदे भरण्याचा घेतलेला निर्णय**

**(४४) १२९००३ (०५-१२-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य प्रशासनात यावर्षी ३६ हजार पदाची भरती होणार असून त्या पैकी केवळ 'क' आणि 'ड'वर्गातील पदे हि पाच वर्षासाठी मानधन तत्वावर भरली जातील तर वर्ग एक आणि दोनची पदे राज्य लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतील असा खुलासा वित्त विभागाने केला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरीत ३६ हजार पद भरती पुढच्या वर्षी दुस-या टप्प्यात भरण्यात येणार असून 'क'वर्गाची पदे जिल्हा निवड मंडळामार्फत तर 'ड'वर्गाची पदे भरण्याचे अधिकार खाते प्रमुखांना देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०१-२०१९) :** (१), (२) व (३) शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सेवेशी निगडीत असलेली पदे जुन्या आकृतीबंधानुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असलेल्या पदांच्या १०० टक्के भरण्यास संबंधित प्रशासकीय विभागांना वित्त विभागाच्या दि. १६ मे, २०१८च्या शासन निर्णयान्वये मुभा देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद मानधनाची अट वगळण्याच्या दृष्टीने वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक, दि. ७ डिसेंबर, २०१८ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यान्वये, सदर सर्व पदे भरताना ती प्रचलित कार्यपद्धतीनुसार भरण्यात येतील. अशी सुधारित तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक (जि.नाशिक) शहरात गुन्हे शाखेच्या पथकाने मगरीची व कासवांची तस्करी करणा-यास अटक केल्याबाबत**

**(४५) १२९४६६ (०७-१२-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (जि.नाशिक) शहरातील कोकणीपुरा व जेल रोड परिसरात नाशिक शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मगरीची ८ पिल्ले व २ कासवांची तस्करी करणा-या तरुणांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केलेली आहे काय,चौकशीत काय आढळून आलेले आहे व तद्नुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०१-२०१९) :** (१) व (२) दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी व त्यासुमारास कोकणीपुरा व जेल रोड परिसरात मगरीचे ८ पिल्ले व २ कासवांची तस्करी करण्याऱ्या तरुणांना नाशिक शहर गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेवून वन विभागाकडे हस्तांतरीत केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी वन गुन्हा नोंदविण्यात आला असून चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. सदर आरोपीं विरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## म्हातोडी, बाभुळगाव,गांधीग्राम व देगाव (जि.अकोला) या परिसरात वन्य प्राण्यामुळे पिकांचे झालेले नुकसान

**(४६) १२९७३७ (०७-१२-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हातोडी, बाभुळगाव,गांधीग्राम व देगाव (जि.अकोला) या परिसरात वन्य प्राणी पिकांचे नुकसान करीत असल्याने वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतक-यांनी वन विभागाकडे केली असून देखील वन विभागाचे याकडे र्दुलक्ष करत असल्याची बाब माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत व नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन १८-१९ मध्ये माहे एप्रिल, २०१८ ते नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत अकोला वन विभागामध्ये वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याचे ११०९ प्रकरणे निदर्शनास आली असून उपरोक्त प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे नुकसान टाळण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- शेतपिक नुकसान करणारे वन्यप्राणी निलगाय व रानडुक्कर यांना पारध करण्याच्या अटींमध्ये सुलभीकरण करण्यात आलेले आहे.
- पिक व फळझाडाचे नुकसान झाल्यास वेळोवेळी नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ करण्यात आलेली आहे.
- पिक फळझाडाचे नुकसान प्रकरणात नुकसान भरपाईच्या तात्काळ अदा करण्याकरिता सदर विषय राज्य सेवा हक्क कायदयामध्ये समाविष्ट करून सेवा Online करण्यात आली आहे.

• वन्यप्राणी वनक्षेत्राच्या बाहेर येवू नये म्हणून वनक्षेत्रात त्यांना पिण्याकरीता पानवठे तयार करण्यात आलेले असुन जलसंधारण व मृद संधारणीची कामे हाती घेण्यांत येतात.
• विविध योजने अंतर्गत कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
• डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजना, DPDC, व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठान या योजने अंतर्गत शेतक-याने अर्ज केल्यास त्यास वैयक्तिक व सामुहिक स्तरावर सौर कुंपन/चेनलिंक फेन्सिग उभारण्यास अर्थ सहाय्य करण्याची तरतुद आहे.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी खोऱ्यामध्ये वन्य प्राण्यांपासून शेतपिकांचे होत असलेले नुकसान

**(४७) १२९९५९ (०७-१२-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी खोऱ्यातील बहुतांश लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय असुन या खोऱ्यामध्ये हत्ती, गवा, रानडुक्कर या वन्य प्राण्यांनी शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने सदर नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाईची जी रक्कम निश्चित केली आहे ती जिल्हयातील इतर ठिकाणच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कासारी खोऱ्यातील शेतक-यांच्या जमिनींची व पिकांची प्रतवारी पाहता सदर ठिकाणच्या पीक नुकसानीच्या भरपाईची रक्कम वन विभागाकडून वाढवून मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०१-२०१९) :** (१) कोल्हापूर जिल्हयातील शाहुवाडी तालुक्यातील कासारी खोऱ्यात असणाऱ्या गावांमध्ये रानडुक्कर, गवा व हत्ती या वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याचे १२९ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर यांचेकडून प्राप्त सरासरी उत्पादकतेच्या आधारे गुंठे निहाय पिकांचे मुल्य निश्चित करण्यात आले आहे.

(३) वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या शेतपिक नुकसानीच्या प्रकरणात अदा करावयाच्या अर्थसहाय्यात वेळोवळी वाढ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मौजे बोराळा (ता. चिखली जि. बुलढाणा) या गावात वन्यप्राण्याकडून होणरे नुकसान.**

**(४८) १३०७३५ (०७-१२-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोराळा (ता. चिखली जि. बुलढाणा) हे गाव वनविभाग क्षेत्रात येत असल्याने वनविभागाकडून सदर गावाला संरक्षणासाठी तारेचे कुंपण नसल्याने ब-याच वेळा गावातील बक-या व पाळीव जनावरांची वन्य प्राण्यांकडून वारंवार जिवीतहानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावात जाण्यासाठी रस्ता बांधण्यासाठी वन विभागाची परवानगी मिळण्याबाबत व गावाचे वन्यप्राण्याकडून संरक्षण करण्यासाठी तारेचे कूंपण घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे डोंगरशेवली येथिल कक्ष क्रमांक ५१८ मधील ०.३९९ हेक्टर वन क्षेत्रामधून डोंगरखंडाळा ते बोराळा रस्ता ग्रा.म. ०२ ता. चिखली वनक्षेत्रातून रस्त्याचे बांधकाम करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी तारेचे कुंपण करण्याची मागणी केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**देऊळगावमही ( जि.बुलढाणा ) येथे वन्य प्राण्यांपासून झालेले नुकसान**

**(४९) १३२३६९ (०७-१२-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावमही (जि.बुलढाणा) येथील गट क्र.१६८ मधील भाग २ मध्ये श्री.सत्त्तार खान जैतुल्लाह खान पठाण यांच्या शिवारात लांडग्यांच्या कळपाने गोठयातील १२ बक-यांची शिकार केल्याची घटना माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतक-यास मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०१-२०१९) :** (१), (२) व (३) श्री. सत्तारखॉ जयतुल्लाखॉन पठाण, देऊळगाव मही (जि. बुलढाणा) यांच्या मालकीच्या ८ बकऱ्यांचा लांडग्यांच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणी मृत पशुधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु. ४०,५००/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**ढेकु खुर्द, (ता. नांदगांव, जि. नाशिक) येथील श्री कपिलनाथ आश्रम या तीर्थक्षेत्राचा वन पर्यटन योजनेत समावेश करणेबाबत**

**(५०) १३२४५७ (०६-१२-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेकु खुर्द, (ता. नांदगांव, जि. नाशिक) येथील श्री कपिलनाथ आश्रम या तीर्थक्षेत्राचा वन पर्यटन योजनेत समावेश करणेबाबतची मागणी दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनीधींनी मा. मंत्री व मा. राज्यमंत्री, वने यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने श्री कपिलनाथ आश्रम या तीर्थक्षेत्राचा वन पर्यटन योजनेत समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नांदगांव वनपरिक्षेत्रातील कासारी परिमंडळामधील ढेकु नियतक्षेत्र अंतर्गत मौजे ढेकु खुर्द राखीव वन कक्ष क्र.४९८ मध्ये पुरातन काळातील कपिलनाथ आश्रम व त्यांचे लगतचे २.०० हेक्टर क्षेत्रामध्ये दगड, विटा व सिमेंट कॉंकिटचे विविध अनाधिकृत बांधकामे असल्याचे आढळून आले. सदर बांधकामांची कुठलीही पुर्व परवानगी नसल्यामुळे दिनांक १५.११.२०१८ रोजी भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये अवैध अतिक्रमाणाबाबत वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नांदगाव वनपरिक्षेत्रातील वन कक्ष क्र.४९८ मध्ये अनाधिकृत अतिक्रमणामुळे भारतीय वन अधिनियम १९२७ चे उल्लंघन होत असल्यामुळे सदर ठिकाणी निसर्ग पर्यटनास चालना देण्याचे काम करण्यास वाव नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.